लेखापरिक्षणास कागदपत्र सादर न करण्याबाबत दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना.

2 . MAR 2018

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक पंरास २०१७/प्र.क्र.४/वित्त-७

बांधकाम भवन इमारत, पहिला मजला, २५, मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई ४०० ००१. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८

९४५

## परिपत्रक

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ (१) अन्वये लेखापरिक्षणास कागदपत्रे न सादर करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर रु.१००/- इतका दंड आकारण्याची तरतूद आहे. सन २०११ चा मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश क्र.५ मधील कलम ८ नुसार सदर दंडाची रक्कम रु.२५०००/- इतकी करण्यात आली आहे.

पंचायत राज समितीसमोर जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग संदर्भात दिनांक १९-०४-२०१७ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळेस लेखापरिक्षणाचे वेळी कागदपत्र सादर न केल्यास संबंधितांवर कारवाई करणेबाबतच्या अधिनियमानुसार रु.१००/- इतका दंड आकारण्यात आल्याचे पंचायत राज समितीस सांगण्यात आले. यावर समितीने अशा प्रकरणांमध्ये रु.२५०००/- दंड आकारण्याची तरतूद असतानाही रु.१००/- दंड आकारण्यात आल्याचे नमूद केले. लेखापरिक्षणास कागदपत्रे न देण्याची घटना ज्या कालावधीतील असेल त्यावेळच्या प्रचलित नियमानुसार दंडाची आकारणी करावी किंवा सन २०११ मध्ये संबंधित अधिनियमात सुधारणा झालेली असल्यामुळे त्याला सुधारित नियमानुसार रु. २५०००/-दंड आकारावा याबाबत संदिग्धता असल्यामुळे यासंदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याबाबत मा. अध्यक्ष पंचायत राज समिती यांनी निर्देशित केले. त्यानुसार विधी व न्याय विभागाने या प्रकरणी असे अभिप्राय दिले आहेत की, लेखापरिक्षणास कागदपत्र न दाखविण्याची घटना ज्या कालावधीतील असेल, त्यावेळी त्याकरिता जो दंड अस्तित्वात होता त्या दराने दंड आकारणे योग्य होईल. विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार यापुढे लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन न देण्याबाबत दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद
4 APR 2018
महत्वाचे
उप मु.का.अ.
(ग्रा.पं.)

(असीम गुप्ता)

सचिव

जा.क्र.सामवि/स्वका/आरआर/२२३/२०१८
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगाव
दि ३१/०३/२०१८